दैनिक **रायगड नगरी**
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक २३६ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.२६ नोव्हेंबर २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# उरण येथील जीडीएल कंपनीवर इन्कमटॅक्स विभागाची धाड





**दै.रायगड नगरी । उरण**

**रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील नवघर ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या गेटवे डिस्ट्रिपार्कस् लिमिटेड ( जीडीएल ) या कंपनीवर इन्कमटॅक्स विभागाच्या अधिकाऱ्यांनी गुरुवारी (२४) धाड टाकली आहे.सुमारे १०० अधिकारी, कर्मचारी सुरक्षा यंत्रणांसह सकाळी ११ वाजल्यापासून गेट बंद करून कागदपत्रं व कंपनीच्या आर्थिक उलाढालीची कसुन तपासणी करीत आहेत.**

उरण तालुक्यातील नवघर ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या गेटवे डिस्ट्रिपार्कस् लिमिटेड (जीडीएल) या कंपनीतुन कंटेनर मालाची मोठ्या प्रमाणावर आयात –निर्यात केली जाते. या कंटेनर यार्डमधून सोने, अमली पदार्थ, रक्तचंदन आणि इतर तस्करीच्या अनेक घटना उघडकीस आल्या आहेत. त्यामुळे हे कंटेनर यार्ड याआधीच डीआरआय, न्हावा– शेवा सीमा शुल्क, पोलिस यंत्रणेच्या रडारवर आहे. तस्करीच्या घटनांमुळे याआधीच सुरक्षा यंत्रणेच्या रडारवर असलेल्या कंपनीवर गुरुवारी सकाळी सीमा शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी धाड टाकली आहे. गुरुवारी सकाळी ११ वाजता गुप्तपणे टाकण्यात आलेल्या धाडीत सुरक्षा यंत्रणांसह सुमारे १०० अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले आहेत. तपासणी दरम्यान अधिकाऱ्यांनी कंपनीचे गेट बंद केले आहे.कर्मचारी, अधिकाऱ्यांचे फोन स्वीच ऑफ ठेवण्यास भाग पाडले आहे. त्यामुळे आतमधील कारवाईची खबरबात लागणे अशक्य होऊन बसले आहे.

छाप्याची खबर मिळताच उरण पोलिसांनी इन्कमटॅक्स विभागाचे अधिकारी आणि कंपनीकडून माहिती मिळवण्यासाठी प्रयत्न केले. मात्र कारवाई गुप्त असल्याचे सांगत माहिती जाणून घेण्यासाठी गेलेल्या पोलिसांनाही इन्कमटॅक्स विभागाच्या अधिकाऱ्यांनी माघारी धाडले असल्याची माहिती उरण पोलिसांनी दिली. या कारवाई प्रकरणात इन्कमटॅक्स विभागाच्या अधिकाऱ्यांकडून काही अधिक माहिती मिळते काय याची प्रतीक्षा लागुन राहिली असल्याचे न्हावा–शेवा बंदर विभागाचे एसीपी धनाजी क्षीरसागर यांनी सांगितले.

# एकदरा परिसरात पिसाळलेल्या गाईचा हैदोस : हल्यात पाच जण जखमी



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरूड तालुक्यातील एकदरा गावात एका दिवसात पिसाळलेल्या गाईच्या हल्यात पाच जण जखमी झाले आहेत. गेले तिन दिवस ही गाय दिसेल त्या पुरुष, स्त्रीयांवर, मुलांवर हल्ले करत आहे. तिन दिवसांत १२ जणांवर या गाईने हल्ला केला आहे. या वाढलेल्या प्रकारानंतर गावकऱ्यांनी जोखीम घेऊन या गाईला जेरबंद केले.

आज सकाळी एकदरा परिसरात सकाळी ६:३० वाजत मॉर्नींग वॉक करुन येताना भंगार वाल्यांच्या परिसरात गाईंचा कळप होता. त्यात एक गाय कुत्रा चावल्याने पिसाळलेली होती. गेले दोन दिवस ही गाय दिसेल त्या पुरुष, स्त्रीयांवर, मुलांवर हल्ला करून जखमी करत होती. आज तिसऱ्या दिवशी मॉर्नींग वॉक करुन परतनाऱ्या पत्रकार संतोष रांजणकर यांच्यावर या गाईने हल्ला केला होता. त्यावेळी स्वतःचा जिव वाचवण्यासाठी पळताना जोरात आपटल्याने ते जखमी झाले आहेत .

त्यानंतर या गाईने कोळंबी सोलत असलेल्या कोळी महिलेवर हल्ला केला व तिलाही जखमी केले. या परिसरात गोमुख कडे जाणाऱ्या रस्त्यावर एका मुलीला जखमी केले. त्यानंतर या गाईने एकदरा पुलावर अशोक शापुरकर यांच्यावर हल्ला करत असताना त्याने पुलाच्या कठड्यावरुन स्वतःचा जिव वाचवण्यासाठी लोंबकळत राहिल्याने तो सुद्धा जखमी झाला.

सदर या प्रसंगामुळे अखेर ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन या गाईला जेरबंद केले. ही गाय कुत्र्यांनी चावल्याने पिसाळलेली होती. त्यामुळे ही सर्वांवर हल्ला करत असल्याचे समजते. सदर गाईला तिचे मालक डोंगरी गावातील उत्तम चाफिलकर यांच्या ताब्यात देण्यात आले. त्यामुळे स्थानिक ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

# संविधान दिनी पर्यटन संचालनालयामार्फत चवदार तळे महाड येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्किटचा शुभारंभ कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

संविधान दिवसाचे औचित्य साधून दि. २६ नोव्हेंबर रोजी पर्यटन संचालनालयाद्वारे मुंबई, कोंकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद व नागपूर या ठिकाणी असलसेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडित घटना, इतिहास आणि त्यांच्या कार्याची माहिती सामान्य जनतेला मिळण्यासाठी विभागनिहाय टूर सर्किटचे आयोजन करण्यात आले आहे. या टूर सर्किटचे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच पर्यटनमंत्री यांच्याप्रमुख उपस्थितीत मुंबई येथे सायं.५.०० वाजता करण्यात येणार आहे.

कोकण विभागातील टूर सर्किटचे आयोजन पर्यटन संचालनालय, कोकण विभाग, नवी मुंबई आणि जिल्हाधिकारी कार्यालय,रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. या टूर सर्किटचा औपचारिक शुभारंभ कार्यक्रम दि.२६ नोव्हेंबर,२०२२ रोजी आ.भरत गोगावले यांच्या हस्ते चवदार तळे,महाड जि.रायगड येथे सायंकाळी ५.०० वा. करण्यात येणार आहे.

सदर कार्यक्रमामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडित सांस्कृतिक कार्यक्रम, बुध्दिस्ट टुर सर्किटचे उद्घाटन व टूर सर्किटची उपस्थितांना माहिती करून देणे, तसेच कार्यक्रमादरम्यान मुंबई येथील मुख्य कार्यक्रम थेट प्रक्षेपित करणे इ. विविध उपक्रमांचा समावेश आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडीत विविध पैलूंची माहिती करून घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या टूर सर्किटच्या सुवर्णसंधीचा लाभ

.../२

# गायरान जमिनीसंदर्भात ग्रामस्थांना न्याय मिळवून देणार : आ.महेश बालदी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

गायरान जमिनीसंदर्भात ग्रामस्थांना आलेल्या नोटीस ही चुकीची, बेकायदेशिर व कायदयाच्या तरतुदी विरुद्ध असून कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय मोघमपणे नोटीसीचा नमुना (फॉरमॅट) तयार करून व गाळलेले शब्द भरुन पाठविलेली आहेत. त्यामुळे ग्रामस्थांनी या संदर्भात घाबरू नये, असे आवाहन आमदार महेश बालदी यांनी केले आहे. तसेच या संदर्भात मी आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, असेही आमदार महेश बालदी यांनी नागरिकांना आश्वासित केले आहे.

उरण विधानसभा मतदार संघातील अनेक गावातील घरांना गायरान जमिनीचे कारण देऊन घरे निकषासित शासनाने नोटीस दिल्या आहेत. विशेषत्वाने या घरांचे असेसमेंट सदरी नावाची रितसर नोंद आहे. तसेच ग्रामपंचायत कर नियमित भरले जात आहे. गेली २० वर्षांपासून राहत असल्याची घराची रितसर नोंद ग्रामपंचायत दप्तरी आहे. ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५३ (२) प्रमाणे जर एखादया अतिक्रमण क्षेत्राची एखादे अतिक्रमण असल्यास व ते सिध्द झाल्यास अतिक्रमण झाल्यापासून ६ महिन्याचे आत सदर अतिक्रमण काढणेचा अधिकार ग्रामपंचायतीला आहे.

जर मुदतीत गायरान अतिक्रमण काढले नाही तर योग्य त्या दिवाणी कोर्टाकडून अतिक्रमण सिध्द करून घेणे व त्यानंतर पुढील कार्यवाही करणे गरजेचे व आवश्यक आहे. अशी वस्तु–स्थिती असताना बेकायदेशीर चुकीची नोटीस पाठविण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. त्यामुळे आमदार महेश बालदी यांनी ग्रामस्थांनी

.../२

# टाटा ट्रकचा झालेल्या भीषण अपघातात चालकाचा मृत्यू



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पुणे–मुंबई हायवे वरील मुंबई लेनवर किमी ०३.४०० खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीत टाटा ट्रकचा आज पहाटे अपघात झाला असून यामध्ये चालकाचा मृत्यू झाला आहे.

टाटा ट्रक क्रमांक MH04 JU 3307 क्रमांकवरील चालक रोहिदास चव्हाण (वय ३१ वर्ष, रा नांदगाव नाशिक) हा त्याच्या ताब्यातील वाहन पुणे मुंबई एक्सप्रेस हायवेने मुंबई बाजूकडे जात असताना त्याचा वाहनावरील नियंत्रण सुटल्याने त्याने पुढे तिसऱ्या लेन ने चालत असलेल्या समीर अन्सारी (वय ३८ वर्ष राठी वापी सिलवासा, गाजीपुर युपी) यांच्या ट्रक क्र DN 09 R 9338 ला पाठीमागून जोरात ठोकर मारल्याने तो गंभीर जखमी झाला असून यामध्ये त्याचा मृत्यू झाला. या अपघ–ातात मृत्युमुखी पडलेल्या वाहनचालकास पुढील कारवाईसाठी उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे ॲम्ब्युलन्स ने पाठवण्यात आलेले आहे. तसेच सदर अपघातग्रस्त वाहन आयआरबी

.../२

# कळंबोली स्टील मार्केट मधील असुविधे विरोधात बाळासाहेबांची शिवसेनेचे एक दिवसीय लाक्षणिक बंद आंदोलन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आशिया खंडातील क्रमांक एक चे कळंबोली स्टील मार्केट समस्यांच्या गर्तेत अडकले आहे. या विरोधात बाळासाहेबांच्या शिवसेनेने शुक्रवारी आंदोलन केले. या निमित्ताने एक दिवसीय लाक्षणिक बंदचे आवाहन पक्षाचे पनवेल जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांनी केले होते. याला उत्सफूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी कळंबोली स्टील मार्केट परिसरातून रॅली काढण्यात आली. या रॅलीत पनवेल जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे, महानगर प्रमुख प्रथमेश चंद्रशेखर सोमण, उपजिल्हा प्रमुख परेश पाटील, कामोठे शहर प्रमुख सुनिल गोवारी, पनवेल शहर प्रमुख प्रसाद सोनावणे, खारघर शहर प्रमुख प्रसाद परब आदीसह मोठ्या संख्येने व्यापारी वर्ग सहभागी झाला होता. यावेळी बोलताना संपक्र प्रमुख रामदास शेवाळे यांनी सांगीतले की, कळंबोली स्टील मार्केटमध्ये सुविधांचा वाणवा आहे. रस्ते, पाणी, स्ट्रीट लाईट, पावसाळी गटारे याशिवाय धुळीचे साम्राज्य अशा अनेक समस्यांच्या चक्रव्यूहामध्ये मार्केट अडकले आहे. त्याचा त्रास व्यापारी, वाहतूकदार, माथाडी कामगार त्याचबरोबर इतर सर्वांना होत आहे. बाळासाहेबांच्या शिवसेनेच्या वतीने बाजार समितीला याबाबत २५ नोव्हेंबर चे अल्टिमेटम दिला होते. परंतु त्यांच्याकडून कोणतेही उत्तर किंवा प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून बाजार समितीमधील

.../२

श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या चरण पादुकांचा प्रचार दौरा
२१ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर २०२२
दैनंदिन कार्यक्रम :- रोज सकाळी काकड आरती, अभिषेक, पूजा, सांप्रदायिक भिक्षा, किर्तन असे विविध कार्यक्रम होणार आहेत.
तरी सर्वांनी याचा अवश्य लाभ घ्यावा.
श्री.मकरंदबुवा रामदासी यांचे
सुश्राव्य किर्तन : वेळ सायं.६.०० वा.
श्रीसमर्थ सेवा मंडळ
(सज्जनगड)
कै.मारुतीबुवा रामदासी
स्थळ : कश्यप हॉल, टिळक रोड, पनवेल

## प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) योजनेंतर्गत कोकण विभाग ‘अव्वल’

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते कोकण विभागीय आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर सन्मानित



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त मुंबई येथे ‘अमृत महाआवास अभियान २०२२–२३’ च्या राज्यस्तरीय शुभारंभ व पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) आणि राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांतर्गत ‘सर्वोत्कृष्ट विभाग’या गटात प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दल प्रभारी कोकण विभागीय आयुक्त तथा रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते काल (दि.२४ नोव्हेंबर) रोजी सन्मानित करण्यात आले.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष ड.राहुल नार्वेकर, ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन, ग्राम विकास व पंचायत राज विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार, राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृहनिर्माणचे संचालक डॉ.राजाराम दिघे तसेच राज्यस्तरीय वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते.

सन २०२४ पर्यंत

.../२

# लोकशाहीचं चांगभलं!

महाराष्ट्रातील २४ महापालिकांसहित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा जो काही घोळ गेल्या काही वर्षांत सगळ्या सरकारांनी चालविला आहे, त्याला तोड नाही. देशातील संसदीय आणि विधिमंडळ निवडणुका महत्त्वाच्या असतातच. त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी निवडणूक आयोगही आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कामाकडे न्यायसंस्थेचे कसे लक्ष असते, हेही गेल्या काही दिवसांत दिसते आहे. मात्र, लोकशाहीचा हा सारा डोलारा निकोप उभा राहायचा आणि चालायचा असेल तर अगदी तळातील म्हणजे स्थानिक पातळीवर लोकशाही नीट नांदायला हवी. ती नांदायची असेल तर या स्थानिक निवडणुका नीट व्हायला हव्यात. मात्र, आता राज्य सरकारने राज्यातील २४ महापलिकांची नव्याने प्रभागरचना करण्याचा जो निकाल घेतला आहे, त्यामुळे ही लोकशाहीची प्रक्रिया निर्वेध कशी पार पडणार, असा प्रश्नच आहे. यात अनेक मुद्दे गुंतलेले आहेत. पहिला म्हणजे, मुंबई महापालिकेची वॉर्डरचना वेगळी आहे. तेथे एक वॉर्ड-एक नगरसेवक अशी पद्धत पूर्वापार चालू आहे. ती आजही कायम आहे. मात्र, मागच्या ठाकरे सरकारने शहराची वाढीव लोकसंख्या लक्षात घेऊन एकूण वॉर्डसंख्या २२७ वरून २३६ वर नेली होती. ती शिंदे-फडणवीस सरकारने पुन्हा २२७ वर आणली. हे प्रकरण थेट सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेले. ते तेथून उच्च न्यायालयात आले. आता तेथे या प्रकरणाचा निकाल अपेक्षित आहे. खरेतर, शहरांच्या हद्दी वाढणे, त्यात नवी गावे येणे, लोकसंख्या वाढणे आणि त्यानुसार शहरातील सर्वच मतदारसंघांची पुनर्रचना होणे, या साऱ्या प्रशासकीय तसेच निवडणूक आयोगाच्या अखत्यारीत येणाऱ्या बाबी आहेत. त्यात राजकारणाचा आणि राजकीय नेत्यांचा काही संबंधच असता कामा नये. मात्र, आपल्याकडे राजकीय कोन किंवा स्वार्थ नसणारा एकही निर्णय होत नाही. शहरातले साधे गटार किंवा फूटपाथही जिथे राजकीय संघर्षाविना होत नाही; तिथे ही रचना सरळ होईल, ही अपेक्षाच अस्थानी आहे. आता राज्य सरकारच्या निर्णयामुळे राज्यातील सर्व महापालिकांमध्ये अभूतपूर्व गोंधळ उडणार आहे. जनगणना २०११ सालची गृहित धरायची, प्रभाग रचना मात्र २०१७ सालची कायम ठेवायची आणि नव्या सर्व मतदारांना सामावून घ्यायचे, हे आव्हान आता आहे. त्यातच, महापालिकांमधला एक प्रभाग किती वॉर्डांचा असावा, यावर केवळ दोन सरकारांचेच नव्हे तर त्यांच्या मित्रपक्षांचेही एकमत नव्हते. गेल्या ठाकरे सरकारमध्ये शिवसेनेला चार वॉर्डांचा एक प्रभाग हवा होता, तर राष्ट्रवादी काँग्रेसला दोन वॉर्डांचा एक प्रभाग हवा होता. शेवटी, तीनवर तडजोड झाली. हे चित्रही आता बदलले आहे. नव्याने प्रभागरचना करण्याचा जो ताजा आदेश राज्य सरकारने काढला आहे, त्यात एका प्रभागात किती नगरसेवक असावेत, याविषयी काहीच स्पष्ट उल्लेख नाही. सन २०१७ मध्ये देवेंद्र फडणवीस यांचे सरकार असताना ज्या निवडणुका झाल्या होत्या, तेव्हा मुंबईसहित काही अपवाद वगळता चार वॉर्डांचा एक प्रभाग होता. मात्र, आत्ताची नवी रचना कशी होणार याबाबत, पुणे, पिंपरी-चिंचवड, औरंगाबाद यांच्यासहित सर्वच महापालिकांचे प्रशासन संभ्रमात असणार, हे उघड आहे. गेल्या महापालिका निवडणुकांमध्ये चार सदस्यांचा एक प्रभाग असल्यामुळे भाजपचा राजकीय फायदा झाल्याचा अनुभव आहे. त्यामुळे, नुकताच निघालेला आदेश स्पष्ट नसला तरी चार सदस्यांचा प्रभाग होण्याची दाट शक्यता आहे. एक प्रभाग - एक प्रतिनिधी आणि एक प्रभाग - अनेक प्रतिनिधी या दोन्ही पद्धतींचे काही फायदे आणि काही तोटे आहेत. मात्र, ते फायदे-तोटे हे पक्षांच्या लाभहानीच्या तराजूत न मोजता मतदान करणाऱ्या मतदारांच्या आणि स्थानिक स्वराज्य संस्थेत जाऊन काम करू इच्छिणाऱ्या पक्षनिरपेक्ष उमेदवारांच्या नजरेतून पाहायला हवेत. आज लोकसभा किंवा विधानसभा तर सोडाच; पण स्थानिक पातळीवरची पालिका, जिल्हा परिषद किंवा महापालिकेची निवडणूक लढविण्याचे स्वप्नही एखादा तळमळीचा सामाजिक कार्यकर्ता पाहू शकत नाही. पुण्यासारख्या प्रगतिशील शहरात नानासाहेब परुळेकर यांच्या पुढाकाराने झालेला 'नागरी संघटने'सारखा पक्षनिरपेक्ष स्थानिक राजकारणाचा प्रयोग तर स्वप्नवत वाटावा, अशी आजची स्थिती आहे. नवी प्रभागरचना ही लोकसेवा करू इच्छिणाऱ्यांसाठी कायमची दारे बंद करणारी व्यवस्था होते आहे का, याचाही सखोल विचार कधीतरी करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे, राष्ट्रीय किंवा राज्यस्तरावरील पक्षांनी अगदी ग्रामपंचायतीपासून महापालिकेपर्यंत प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेत आपलेच राज्य हवे, हा हट्टही सोडायला हवा. पण तसा त्यांनी सोडला असता तर प्रभागरचनेचे इतके मोठे महाभारत महाराष्ट्रात घडते ना. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीबाबत सरकारी कागदपत्रे मागविताना नुकतीच अनेक मौलिक निरीक्षणे नोंदविली आहेत. पण आपापल्या पद्धतीनेच 'लोकशाहीचं चांगभलं' करण्यात गुंतलेले पक्ष आणि त्यांचे नेते तिकडे कशासाठी पाहतील? प्रभागरचनेचा घोळ हा व्यवस्थेतील दोष नसून ती आपल्या हितासाठी राबविणाऱ्यांचा खेळ आहे!

# कालव्याच्या कामाला अद्याप सुरुवात नाही, दुरुस्तीला मुर्हत सापडेना ग्रामस्थ पाण्याच्या प्रतीक्षेत

**दै.रायगड नगरी । रोहा**

आंबेवाडी, किल्ला ते निवी कालव्यासाठी येथिल शेतकऱ्यांनी सुरु केलेले आंदोलन, उपोषण पाटबंधारे प्रशासनाकडून डिसेंबर जानेवारी दरम्यान पाणी सोडण्याचे लेखी आश्वासन मिळाल्याने थांबले होते. मात्र डिसेंबर अखेर पाणी सोडण्याच्या दृष्टीने अद्याप कालव्याची साफसफाई, दुरुस्तीला सुरुवात केली गेली नसल्याने विभागातील ग्रामस्थ, समन्वय समितीने याबाबत स्पष्ट नाराजी व्यक्त केली आहे. तर कालव्याला पाणी आणणारच असा शेतकऱ्यांचा निर्धार असून पाण्यासंदर्भात लवकरच प्रशासकीय बैठक घेणार असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे.

कालव्याचे पाणी पाटबंधारे विभागाने दुरुस्तीच्या नावाखाली बंद केले. नको तिथे मोऱ्या, काँक्रिटीकरण कामावर करोडो रुपये शासकीय निधीची उधळपट्टी केली. कामे अर्धवट, निकृष्ट करून करोडोंचा गैरव्यवहार झालेला आहे. त्यासंबधी तक्रारी व चौकशीची मागणी कायम आहे. कालवा दुरुस्तीसाठी पाणी तुम्ही बंद केलेत, आता पाणी तुम्हीच सोडा, अशी आग्रही मागणी अनेक वर्षापासून ग्रामस्थांची आहे. अखेर यावर्षी आम्ही कालव्याला पाणी घेतल्याशिवाय राहणार नाही, असा आक्रमक पवित्रा विभागातील ग्रामस्थांनी घेतला. त्या भूमिकेला आंबेवाडी, संभे, पाले, किल्ला ग्रामस्थांनीही मोठे पाठबळ दिले. पाण्यासाठी अल्टिमेटम देत ग्रामस्थ आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम राहिले. त्यातच सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र जाधव यांनी डिसेंबरला पाणी सोडण्यासाठी आमरण उपोषणाचा इशारा दिला. त्यानंतर पाटबंधारे प्रशासन नरमले. रोहा तहसील कार्यालयात महत्वाची बैठक झाली. बैठकीला रायगड पाटबंधारेच्या कार्य. अभियंता दीपेश्री राजभोज, तहसीलदार कविता जाधव, समन्वय समितीचे विठ्ठल मोरे, राजेंद्र जाधव, तुकाराम भगत, राकेश बामगुडे, संदेश मोरे, किशोर कळंबे, मारुती फाटक, ज्ञानेश्वर दळवी व ग्रामस्थउपस्थित होते. बैठकीत उपोषण मागे घ्यावे, डिसेंबर अखेर कालव्याला पाणी सोडले जाईल असे लेखी आश्वासन प्रशासनाच्या वतीने मुख्य कार्यकरी अभियंता दीपेश्री राजभोज यांनी दिले. त्यानंतर आमरण उपोषण तूर्तास स्थगित करण्यात आले. कालवा प्रचंड नादुरुस्त आहे. दुरुस्तीची कामे लवकर हाती घेणे गरजेचे आहे, मात्र आजमितीस कालव्याचे कोणतेच काम सुरू नाही, साफसफाई दुरुस्तीला मुहूर्त कधी सापडणार ? असा सवाल उपस्थित झाला आहे. पाटबंधारे विभागाकडून दुरुस्तीच्या कामात दिरंगाई होत असल्याचे चित्र दिसत असताना कालवा साफसफाई व दुरुस्तीसाठी तांत्रिक विभाग क्शन मोडवर आहे, अशी मोघम उत्तरे संबधीत पाटबंधारे अधिकाऱ्यांनी दिल्याने कालव्याच्या पाण्यासाठी आंदोलनाच्या भूमिकेत सज्ज रहा, असे आवाहन कालवा समन्वय समितीने पुन्हा केले आहे.

# पनवेल शहर पोलीस ठाण्याने केले अशोक कामठे स्मृती फाउंडेशन शाहिद दौडचे स्वागत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

२६/११ रोजी करण्यात आलेल्या भ्याड हल्याचा निषेध करण्यासाठी तसेच या हल्लयात शहिद झालेल्या जवांनां श्रद्धांजली वाहण्यासाठी अशोक कामठे स्मृती फाउंडेशनच्या माध्यमातून दरवर्षी सांगली ते मुंबई गेट वे ऑफ इंडिया पर्यंत शहिद दौड आयोजित करण्यात येते. सदर दौडचे आज पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या वतीने पळस्पे पोलीस चौकी येथे स्वागत करण्यात आले.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्वागत कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक संजय जोशी यांची उपस्थिती लाभली तर सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल लोखंडे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी सहायक पोलीस निरीक्षक संतोष शेटे, पोलीस उपनिरीक्षक फडतरे, पोलीस उपनिरीक्षक चौगुले आदीनी या दौड चे आयोजक श्रीकांत कुंभार, योगेश रोकडे, निलेश मिसाळ, घनश्याम उके व त्यांच्या बावीस जणांच्या पथकाचे पळस्पे येथे स्वागत केले. यावेळी बोलताना सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल लोखंडे यांनी सांगितले कि, २६ नोव्हेंबर २००८ साली करण्यात आलेल्या भ्याड हल्लयामुळे आपले अनेक वरिष्ठ अधिकारी, पोलीस कर्मचारी तसेच निष्पाप नागरिक शहीद झाले होते. या भ्याड हल्याचा निषेध व निष्पाप शहिदांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २००९ पासून अशोक कामठे स्मृती फाउंडेशन च्या माध्यमातून सांगली ते मुंबई गेट वे ऑफ इंडिया पर्यंत शहिद दौड आयोजित करण्यात येते. ४७० किलोमीटरची हि दौड असते यात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होत असल्याचे त्यांनी सांगितले तर आयोजक श्रीकांत कुंभार यांनी बोलताना सांगितले कि, शहिद स्मृती दिनानिमित्त पेटती मशाल घेऊन हजारोच्या संख्येने भारतीय सहभागी होतात. या मॅरेथॉन च्या माध्यमातून आम्ही देशद्रोह्यांना हा संदेश देत आहोत कि तुम्ही पुन्हा हल्याचा प्रयत्न केला तर २००० किलोमीटर आत घुसून तुम्हाला नेस्तानाबूद करू व तरुण पिढी यात उत्स्फूर्त पणे सहभागी होते हे महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला सतीश मोरे, जगदीश मुकादम आदींसह पळस्पे पोलीस चौकीचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# करंजाडे येथून इसम बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील करंजाडे येथे राहणारा एक इसम दारूच्या नशेत कोठेतरी निघून गेल्याने तो हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. अजय जनार्दन घोटारकर (वय ५३,रा. करंजांडे) असे या इसमाचे नाव असून त्याची उंची ५ फूट २ इंच, रंग सावळा, चेहरा उभट, बांधा - सडपातळ, केस - कुरळे, दाढी वाढलेली असून अंगात निळ्या रंगाचा टी-शर्ट आणि काळी रंगाची हाफ पॅन्ट घातलेली आहे. सदर इसमाबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी क्र. ०२२-२७४५२३३३ किंवा पोहवा अजय कुंभार यांच्याशी संपर्क साधावा.

## श्रीवर्धन विधानसभा उद्धव ठाकरे युवासेना पदाधिकाऱ्यांचा मेंदडी येथे सत्कार

**दै.रायगड नगरी । म्हसळे**

उद्धव बाळासाहेब ठाकरे युवासेनेच्या श्रीवर्धन विधानसभा नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांचा जाहीर सत्कार मौजे.मेंदडी ता.म्हसळा येथे युवासैनीक किरण पारेख यांच्या कार्यालयात करण्यात आला.. यावेळी म्हसळा आणी श्रीवर्धन या दोन्ही तालुक्यातील आजी माजी पधादीकारी, शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

शिवसेना-युवासेनेसाठी दोन्ही तालुक्यातील पधादीकारी,शिवसैनीक यांनी एकत्र येवुन काम करण्याची गरज आहे असे सर्व युवासैनीक पधादीकार्यांनी मत व्यक्त केले. यावेळी युवासेना रायगड उपजिल्हाप्रमुख अमीत महामूनकर, श्रीवर्धन युवासेना तालुका अधीकारी धवल तवसाळकर, माजी तालुका अधिकारी संदेश म्हसकर, म्हसळा युवासेना तालुका अधीकारी कौस्तुभ करडे, मेंदडी येथील शिवसेनेचे श्याम कांबळे तसेच किरण पारेख आदि मान्यवर उपस्थीत होते.

दिनांक : २५/११/२०२२

### जाहीर सूचना

मे.सिमरन इंटरप्राजेस वतीने भागीदार श्री.आकाश अग्रवाल, पत्ता : १२०४, दि अफेअर्स, प्लॉट नं-९, सेक्टर-१७, सानपाडा, नवी मुंबई तमाम जनतेच्या माहितीसाठी खालीलप्रमाणे जाहीर सुचना देत आहेत.

आमचे नावे, ताबे-कब्जातील मौजे आकुर्ली, ता. पनवेल, जि.रायगड येथे महसुल अभिलेखामध्ये वर्णन केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे नमुद केल्याप्रमाणे बिनशेती जमीन मिळकत आहे.

| अ.क्र. | गट नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| १ | ९/अ व १० | ३०६० चौ.मी. |

सक्षम अधिकारी म्हणजेच असोशिएट प्लानर (नैना) सिडको/नैना/पनवेल/आकुर्ली/बीपी-०३९७/एसीसी/२०२२/०१८५ दि.३१/०३/२०२२ व्दारे परवानगी दिलेली आहे आणि सदर सक्षम नगर रचना नियोजन अधिकारी म्हणजेच असोशिएट प्लानर (नैना) सिडको यांनी त्यांचे पत्र क्र. सिडको/नैना/पनवेल/आकुर्ली/बीपी-०३९७/एसीसी/२०२२/०१८५ दि.३१/०३/२०२२ व्दारे कमेंन्समेंट सर्टिफिकेट माहिती जनतेच्या माहितीसाठी प्रकाशित करत आहोत.

| | |
|---|---|
| मालक/विकासकाचे नांव आणि पत्ता | मे.सिमरन इंटरप्रायजेस वतीने भागीदार श्री सागर अग्रवाल, १२०४, दि अफेअर्स, प्लॉट नं-९, सेक्टर-१७, सानपाडा, नवी मुंबई |
| कंत्राटदाराचे नाव आणि पत्ता<br>मिळकतीचे वर्णन | कॉन्ट्रक्स,<br>१३०२, हायटेक सीएचएस, प्लॉट नं -११, सेक्टर-३८, सीवुडस्, नवी मुंबई. |
| विकसनाची परवानगी मंजूर झाल्याचे आदेश क्र. आणि दिनांक | सिडको/नैना/पनवेल/आकुर्ली/बीपी-०३९७/एसीसी/२०२२/०१८५ दि.३१/०३/२०२२ |
| कमेंन्समेंट सर्टीफिकेटचे आदेश क्र. आणि दि. | सिडको/नैना/पनवेल/आकुर्ली/बीपी-०३९७/एसीसी/२०२२/०१८५ दि.३१/०३/२०२२ |
| मंजूर फ्लोअर स्पेस इंडेक्स (एफ.एस.आय.) | मंजूर एफ.एस.आय.१ (एक) |
| एकूण सदनिका आणि त्यांचे एकूण मंजूर क्षेत्र | एकुण ८४ सदनिका ज्या दोन तळमजला अधिक ४ मजल्याच्या इमारतीमध्ये बांधण्याची परवानगी मिळालेली आहे ज्याचा संपूर्ण बांधीव क्षेत्र ३०५६.४१ चौ.मी. |
| मंजूर नकाशे आणि इतर संबंधित कागदपत्रांच्या प्रति संबंधित कागदपत्रांच्या प्रति तपासणीसाठी उपलब्ध असलेल्या जागेचा पत्ता | मे.सिमरन इंटरप्रायजेस वतीने गट नं.९/अ व १०, मौजे आकुर्ली, ता.पनवेल, जि.रायगड |
| आर्किटेक्टचे नाव | ए.एन. आर्च, आर्किटेक्ट-नेहा जैन |
| स्ट्रक्चरल इंजिनिअरचे नाव | आधारशिला कन्सलटंन्ट-समर्थ अग्रवाल |

पृष्ठ क्र.१ वरुन...

## महाड येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्किटचा शुभारंभ कार्यक्रम

जास्तीत जास्त नागरिकांनी चवदार तळे महाड जि.रायगड येथे उपस्थित राहून घ्यावा,असे आवाहन पर्यटन संचालनालय कोकण विभाग, नवी मुंबईचे उपसंचालक (पर्यटन) श्री हनुमंत कृ. हेडे यांनी केले आहे.

## गायरान जमिनीसंदर्भात ग्रामस्थांना न्याय मिळवून देणार : आ.महेश बालदी

घाबरू नये असे आवाहन करून सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन ग्रामस्थांना दिला आहे. त्याचबरोबर या संदर्भात न्यायालयीन लढाईसाठी आपण सज्ज आहोत, असेही त्यांनी अधोरेखित करून ग्रामस्थांना मोठा दिलासा दिला आहे.

## टाटा ट्रकचा झालेल्या भीषण अपघातात चालकाचा मृत्यू

क्रेनच्या सहाय्याने रस्त्याच्या बाजूला करून वाहतूक सुरळीत सुरू केली आहे. यावेळी महामार्ग पोलीस केंद्राचे पळस्पे मोबाईल स्टाफ यांच्यासह, खांदेश्वर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक श्री. पाटील यांचे सहकारी तसेच आय आर बी चे डॉक्टर व स्टाफ उपस्थित होते.

## बाळासाहेबांची शिवसेनेचे एक दिवसीय लाक्षणिक बंद आंदोलन

मूलभूत सुविधांच्या न्याय हक्कासाठी आज आंदोलन करण्यात आले आहे. यावेळी बाजार समिती अधिकाऱ्यांनी या शिष्टमंडळाची भेट घेऊन निवेदन स्विकारले तसेच त्यांच्या भावना शासना पर्यंत पोचहवून १ महिन्याच्या आत समस्यांचे निवारण करु असे ठोस आश्वासन दिले आहे.

## कोकण विभागीय आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर सन्मानित

'सर्वांसाठी घरे'हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे उद्दिष्ट असून 'अमृत महाआवास योजना' २०२२ - २३ अभियानातील ५ लाख घरे पुढील १०० दिवसात बांधण्यात येणार आहेत. विक्रमी वेळेत घरकुले बांधली जाणार असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत गृहप्रवेश करू, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या कार्यक्रमात व्यक्त केला. सर्वांना घरे मिळावीत यासाठी राज्यात विविध योजना राबविल्या जात आहेत. याकरिता सर्वसामान्य लोकांना समोर ठेवून लोकहिताचे निर्णय घेण्यात येत आहेत. राज्याच्या विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. त्यामुळे ग्रामीण विकास यंत्रणेतील अधिकाऱ्यांनी सर्वसामान्यांना दर्जेदार आणि वेळेत घरे देण्यासाठी प्रयत्नशील राहावे. केंद्र आणि राज्य सरकार एकमेकांच्या हातात हात घालून काम करतात, तेव्हा राज्याचा विकास वेगाने होत असल्याचे मत मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी यावेळी व्यक्त केले.

मा.इंदलकर सो

ॲड.राखी व्ही. घरत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज क्र.१३१०/२०२२

ने.ता.१०/०१/२०२३

श्री.सुभाष कमलाकर घरत — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका
खारघर विभाग — सामनेवाला

सदर जाहीर नोटीशीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की,

१) सदर अर्जदारांची मुलगी कै.सागरिका सुभाष घरत, यांचा मृत्यू दि.३१/०१/२०२१ रोजी रा.कमलाकर सदन, बेलपाडा, सेक्टर ३, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी झालेला आहे. अर्जदारांकडून त्यांच्या मुलीच्या मृत्यूची नोंद महानगरपालिका पनवेल दफ्तरी करण्याचे अनावधनाने राहून गेलेले आहे. सबब जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्वये अर्जदाराने त्यांच्या मुलीच्या मृत्यूची नोंद होण्यासंबंधी महानगरपालिका पनवेल यांस योग्य ते आदेश पारित करण्याकरिता पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात अर्ज केलेला आहे.

२) सदर अर्जास कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयाकडे ३० दिवसांचे मुदतीच्या आत सादर कराव्यात. विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मा.न्यायालय अर्जदार यांचे मुलीच्या मृत्यूची नोंद होण्यासंबंधी पनवेल महानगरपालिका यांस मृत्यूचा दाखला देण्यासंबंधी योग्य ते आदेश पारित करतील याची नोंद सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि.२२/११/२०२२ रोजी आमचे सहीने मे.कोर्टाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**

मा.गोडसे सो

ॲड.सुनील प्रकाश तोटावाड

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो. (व.) स्तर यांचे कोर्टात

चौ.अर्ज क्र.१६६३/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.१७/०१/२०२३

श्री.पांडुरंग शिवा जाधव व इतर १ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, वरील अर्जदार क्रं.१ यांची पत्नी, अर्जदार क्रं.२ यांचे आई कै.मिना पांडुरंग जाधव यांचा मृत्यू दि.२६/११/२०२१ रोजी गाव पालेखुर्द, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे. अर्जदार क्रं.१ ते २ हे यांचे कायदेशीर वारस आहेत.

**मिळकत**

**जुना घर नं.६९, नवीन घर नं.३७१, गावाचे नाव मौजे : पालेखुर्द, ता.पनवेल, जि.रायगड, पिन-४१०२०८**

येणेप्रमाणे सदनिका ही मिळकतीचे वर्णन असून सदरहू सदनिकेचे अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी मे.न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार हे कै.मिना पांडुरंग जाधव वारस नाहीत असे अगर यांस वारस दाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.न्यायालयात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन मे.न्यायालय अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२५ माहे ११ सन २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मे.सोनावणे सो. यांचे कोर्टात

ॲड.संतोष पाडळकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१७२५/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.०२/०१/२०२३

कै.गिरीश चिंतामण बोटेकर (मयत) वारस
कु.सानिका गिरीश बोटेकर
वय : २२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.बी.१, माऊली दर्शन को.ऑ.हौ.सोसायटी,
महात्मा फुले रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसने तमाम जनतेस कळविण्यात येते की, कै. गिरीश चिंतामण बोटेकर यांचे दि.२६/०७/२०१३ रोजी त्यांचे राहते घरी बी-१, माऊली दर्शन को.ऑ.हौ.सोसायटी, महात्मा फुले रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झालेले आहे. तसेच कै.गिरीश चिंतामण बोटेकर यांची आई कै.सुमती चिंतामण बोटेकर ह्यांचे दि.१९/११/२०१७ रोजी ए-५०२, साईराज पार्क को.ऑ.हौ. सोसायटी, राजाजी पथ डोंबिवली (पू.), जि.ठाणे येथील त्यांचे राहते घरी निधन झालेले आहे. सदर अर्जाचे कामी अर्जदार हिने कै.गिरीश चिंतामण बोटेकर व कै.सुमती चिंतामण बोटेकर यांच्या मृत्यूदाखल्याच्या मुळ प्रती दाखल केलेल्या आहेत. प्रस्तुत अर्जातील अर्जदार ही कै. गिरीश चिंतामण बोटेकर यांची एकुलती एक मुलगी आहे. कै.गिरीश चिंतामण बोटेकर यांच्या फ्लॅट मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**फ्लॅट मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

फ्लॅट नं.१, बि-विंग, तळमजला, क्षेत्र ५४५ चौ.फूट (बिल्टअप) म्हणजेच ५०.६३ चौ.मी. (बिल्टअप), माऊली दर्शन को.ऑ.हौसिंग, सोसायटी, महात्मा फुले रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड

वर वर्णन केलेली फ्लॅट मिळकत कै.गिरीश चिंतामण बोटेकर यांनी दि.२८/१०/२००५ रोजी मे.दुय्यम निबंधक सो, पनवेल-३ यांचे कार्यालयाकडील नोंदणीकृत दस्त क्र.३८७६/२००५ अन्वये नोंदणीकृत डीड ऑफ ट्रान्सफर ॲण्ड सेल या दस्ताने उक्त रक्कम रु.४,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख पन्नास हजार मात्र) अदा करून खरेदी केलेली आहे. सदर दस्ताची व्हेरीफाईड प्रत प्रस्तुतचे अर्जाचे कामी अर्जदारांनी मे.कोर्टाकडे दाखल केलेली आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीचे वर्णन परिशिष्टामधील मिळकत कै. गिरीश चिंतामण बोटेकर यांची स्वकष्टार्जित मिळकत आहे. कै.गिरीश चिंतामण बोटेकर यांच्या निधना पश्चात त्यांच्या वारसांच्या नावे सदरहू मिळकत करण्याकरिता पनवेल महानगरपालिकेकडून अर्जदार हेच कै.गिरीश चिंतामण बोटेकर यांचे वारस असलेबाबत मे.कोर्टाकडील वारसदाखला आणणेकरिता तोंडी सांगण्यात आलेले आहे. सबब, अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज मे.कोर्टाकडे केलेला आहे.

सदर अर्जाबाबत कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी दि.०२/०१/२०१३ रोजी सकाळी १०.३० वा. मे.कोर्टापुढे सर्व पुराव्यानिशी स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे.

सदरहू मुदतीत जर सदरच्या अर्जास कुणाचीही कसलीही हरकत आली नाही तर मे.कोर्टाकडून अर्जदारांच्या अर्जावर योग्य तो हुकूम करून अर्जदार यांना कै.गिरीश चिंतामण बोटेकर यांचे वारसनोंद दाखला देण्याकामी आदेश दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२५/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात आढळला बेवारस मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात एका ४० वर्षीय इसमाचा बेवारस मृतदेह आढळला असून पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहे.

अमोल सिंग (वय ४० वर्षे) असे या मयत इसमाचे नाव असून त्याचा मृतदेह पनवेल रेल्वे स्टेशन येथे आढळून आला. सदर इसमाबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे क्र ०२२-२७४५२३३३ किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत शेंडगे यांच्याशी संपर्क साधावा.

## तालुका स्तरीय क्रिडा स्पर्धेत ज्ञानांकुर इंग्लिश स्कूल खांबचे घवघवीत यश

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील एम. डी.एन फुचर स्कूल चिंचवली येथे तालुका स्तरीय विविध प्रकारची क्रीडा स्पर्धा नुकतीच संपन्न झाली. या क्रिडा स्पर्धेत ज्ञानांकुर इंग्लिश स्कूल खांब येथील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत घवघवीत यश संपादीत केले आहे.

या क्रीडा स्पर्धेत रोहा तालुक्यातील मराठी, हिंदी, इंग्लिश सर्व माध्यमातील एकूण २० शाळांनी सहभाग घेतला होता. या क्रीडा स्पर्धेत ज्ञानांकुर इंग्लिश स्कूल मधील हर्ष संदीप महाडिक ४०० मिटर रनींग मध्ये प्रथम, कानिका नितीन कचरे ४०० मीटर रनींग मध्ये द्वितीय, व २०० मिटर रनींग मध्ये द्वितीय क्रमांक, मधुरा गणेश कोस्तेकर थाळी फेक मध्ये प्रथम, संस्कृती उमेश चितळकर थाळी फेकमध्ये द्वितीय, अक्षरा रविंद्र मरवडे लांब उडी तृतीय, उंच उडी तृतीय, रनींगमध्ये तृतीय, क्रमांकाचे मानकरी ठरले. तसेच ४ बाय १००रिले रनींग मध्ये कानिका कचरे,अक्षरा मरवडे आराध्या कचरे, आर्या चितळकर यांनी ही यश संपादन केले.

सर्व यशश्वि विद्यार्थ्यांचे मुख्यध्यापिका रिया लोखंडे, संस्थापक चेअरमन रविंद्र लोखंडे, प्रशिक्षक मार्गदर्शक विनायक माहित यांनी अभिनंदन केले आहे



**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

## ॲपद्वारे ३ लाख ६६ हजाराची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बिलीयन बोया ॲपमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला फायदा होत असल्याचे आमिष दाखवून एका भामट्याने सॉफ्टवेअर इंजिनियरला सदर ॲपमध्ये ऑनलाईन पैसे गुंतवणूक करण्यास भाग पाडून त्याच्याकडून तब्बल ३ लाख ६६ हजार रुपये उकळल्याचे उघडकीस आले आहे. खांदेश्वर पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात भामट्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

सदर प्रकरणातील तक्रारदार किंग विनोद शर्मा (४३) खांदा कॉलनी, सेक्टर-६ मध्ये कुटुंबासह राहण्यास असून ते मुंबईतील एका खाजगी कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनियर म्हणून कामाला आहेत. ऑगस्ट महिन्यामध्ये शर्मा यांच्या कंपनीतील प्रशांत राव नावाच्या व्यक्तीने त्याच्या मोबाईलवर बिलीयन बो या ॲपद्वारे तो बेटींग लावून दररोज पैसे कमवत असल्याचे आणि त्यातून त्याने काही पैसे देखील काढल्याचे शर्मा यांना दाखविले होते. त्यामुळे शर्मा यांनी सदर ॲपमध्ये पैसे गुंतवणुकीची तयारी दर्शविल्यानंतर प्रशांत राव याने गणेश नामक व्यक्तीचा मोबाईल नंबर शर्मा याला दिला होता. सदर नंबरवर शर्मा यांनी संपर्क साधल्यानंतर गणेशने शर्मा यांच्या व्हॉटस्ॲपवर बिलियन बो या ॲप आणि ईडीसीआरची लिंक पाठवून देत त्यात ८ रुपये भरण्यास सांगितले. त्यानुसार शर्मा यांनी १० हजार रुपये सदर ॲपमध्ये भरल्यानंतर शर्मा यांनी गुंतविलेले पैसे वाढत असल्याचे त्याच्या निदर्शनास आले. त्यामुळे शर्मा यांनी आपल्या पत्नीच्या मोबाईलवर सदर ॲपची लिंक पाठवून तिच्या नावाने देखील सदर ॲपमध्ये १० हजार रुपये गुंतविले. त्या पैशामध्ये देखील वाढ होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर शर्मा यांनी आपल्या मुलीच्या मोबाईलवर सदर ॲप सुरु करुन तिच्या नावाने देखील १० हजार रुपये गुंतविले. त्याचप्रमाणे शर्मा यांनी पंजाब येथील शेजारी राहणाऱ्या महिलेच्या मोबाईल मध्ये सदर ॲप डाउनलोड करुन त्यामध्ये सुरुवातीला १० हजार रुपये गुंतवणूक करुन त्यामध्ये एकूण ८८ हजार रुपयांची गुंतवणूक केली. दरम्यान, शर्मा यांनी गुंतविलेल्या तिन्ही बिलीयन बोया ॲपच्या खात्यातील रक्कम कमी असल्याचे निदर्शनास आल्यानंतर गणेशने त्यांना आणखी पैसे गुंतवल्यास सर्व पैसे त्यांना परत मिळतील, असे आमिष दाखविले. त्यामुळे शर्मा यांनी गणेशच्या बोलण्यावर विश्वास ठेवून स्वतःच्या आणि मुलीच्या विलियम बो ॲपवर थोडे-थोडे करुन सव्वा दोन लाख रुपये गुंतविले. तर त्याच्या पत्नीने ५३ हजार रुपये गुंतविले. त्यानंतर त्यांच्या तिन्ही खात्यातील पैसे वाढत नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर शर्मा यांनी सदरचे पैसे काढून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, सदर ॲप बंद झाल्याचे लक्षात आले. तसेच गणेश कडून देखील काहीच प्रतिसाद मिळत नसल्याचे लक्षात आल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे शर्मा यांना समजले. त्यानंतर त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

## तुषार म्हात्रे यांचे विज्ञान लेखन ठरले मुंबई-कोकण विभागात सर्वोत्तम

**दै.रायगड नगरी । उरण**

मराठी विज्ञान परिषदेच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय विज्ञान निबंध स्पर्धा २०२२ आयोजित करण्यात आली होती. नुकताच या स्पर्धेचा निकाल लागला असून खुल्या गटात 'मुंबई आणि कोकण' या विभागातून रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील पिरकोन गावचे सुपुत्र तुषार चंद्रकांत म्हात्रे यांच्या विज्ञान निबंधास प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे.

विज्ञान प्रसारासाठी काम करणाऱ्या 'मराठी विज्ञान परिषदे'द्वारे दरवर्षी विज्ञान निबंध स्पर्धा आयोजित केली जाते. यावर्षी खुल्या गटासाठी 'हवामान बदल' हा विषय निश्चित करण्यात आला होता. या स्पर्धेत मुंबई आणि कोकण विभागातून तुषार म्हात्रे (रायगड) यांनी प्रथम क्रमांक तर मनाली परब (भांडूप) यांस द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

प्रमाणपत्र व रोख रक्कम असे पारितोषकाचे स्वरूप आहे. विज्ञान व इतिहास विषयांवर लेखन करणारे तुषार म्हात्रे हे सुप्रसिद्ध ब्लॉगर असून त्यांच्या 'तुषारकी' व 'द रियान किनारे' या ब्लॉगवर नियमितपणे विविध विषयांवरील लेख प्रकाशित होत असतात.

## पनवेल काँग्रेसचे पदाधिकारी अमर अंभोरे यांनी लिहीलेल्या कवितेचा राहुल गांधी यांनी केले कौतुक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

देश भरात एकात्मतेची भावना रुजवण्यासाठी राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली कन्याकुमारी ते काश्मीर साठी काढण्यात आलेल्या भारत जोड़ो यात्रा मध्ये पनवेल चे अनुसूचित जाती विभाग चे पनवेल शहर जिल्हा काँग्रेस चे उपाध्यक्ष अमर अंभोरे यांनी अकोला येथे सहभाग घेतला.

अमर अंभोरे यांनी स्वतः रचलेल्या कवितेची फोटो फ्रेम तेथे उपस्थित असलेल्या सर्व नेते मंडळी, कार्यकर्ते आणि नागरिकांना आवडली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या सहकार्याने भेट नियोजित झाली आणि अमर अंभोरे यांनी त्यांचे आभार व्यक्त केले. भेट झाल्यावर राहुल गांधी थांबून बोलत होते.



आणि मग पदयात्रा पुढे निघाली आणि अमर भाऊ पण चालायला लागले. अमर अंभोरे यांची इच्छा आणि ऊर्जा पाहून राहुल यांचा पण उत्साह वाढला आणि यात्रा सुरू झाली. याच प्रसंगी पुढे अमर यांची भेट माजी पर्यावरण मंत्री जयराम रमेश यांच्या समवेत झाली, माजी मंत्री बी. जी. कोळसे सोबत भेट झाली, उल्हास पवार भेटले, आणि कन्हैया कुमार पण भेटायला आले होते. अमर अंभोरे यांची कविता सर्वांना एवढी आवडली की पक्षाच्या राष्ट्रीय डिजिटल माध्यमांवर चालविण्यात आली आणि अमर भाऊंचे सर्व स्तरातून कौतुक होऊ लागले. तर अशा पद्धतीने पनवेलचे युवक अमर अंभोरे राष्ट्रीय एकात्मतेसाठी भारत जोड़ो यात्रा मध्ये सहभागी झाले. पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटी चे अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते पण यात्रे मध्ये सहभागी झाले होते.

## १८ डिसेंबर रोजी करंजा मच्छीमार संस्थेची निवडणूक

**दै.रायगड नगरी । उरण**

मच्छिमार संस्थेच्या राज्यातील सर्वात मोठी आणि बलाढ्य संस्था अशी ओळख असलेल्या उरण तालुक्यातील करंजा मच्छीमार विविध कार्यकारी सहकारी संस्थेची पंचवार्षिक निवडणूक १८ डिसेंबरला होणार आहे. याची माहिती राज्य मत्स्यव्यवसाय विभागाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्थेचे शिरिष सकपाळ यांनी दिली.

वार्षिक सुमारे ५० कोटी पेक्षा अधिकची उलाढाल असलेल्या संस्थेचे एकूण ३ हजार ८१२ मतदार आहेत.३ हजार ८१२ मतदारातून १७ संचालकांची गुप्त मतदानाने निवड करणार आहेत.यामध्ये दोन महिला संचालकांचा समावेश आहे.याआधी २०१५ रोजी संस्थेची पंचवार्षिक निवडणूक पार पडली होती. २०२०-२१ मध्ये संस्थेची मुदत संपुष्टात आली होती. मात्र कोरोना महामारीमुळे सुमारे दोन वर्ष निवडणूक लांबणीवर पडली होती. आता मात्र मुदत वाढी नंतर येत्या १८ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. मतदानानंतर तत्काळ त्याच ठिकाणी मतमोजणी केली जाणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली.

एकंदरीत करंजा मच्छीमार विविध कार्यकारी सहकारी संस्थेची निवडणूक प्रक्रिया जाहीर झाल्याने करंजा गाव परिसरातील कोळी बांधवांमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.कारण कोळी बांधवांना भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्याचे काम हे शास-नस्तरावर संस्थेचे चेअरमन, संचालक मंडळ हे करत असतात.त्यासाठी आप आपल्या कुटुंबाचा, विश्वासातील संचालक निवडून येण्यासाठी सध्या मोर्चे बांधणी करण्यासाठी सुरुवात झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

---

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग,

### कार्यकारी अभियंता, (विद्युत) यांचे कार्यालय

रायगड विद्युत, सार्वजनिक बांधकाम विभाग रायगड

सार्वजनिक बांधकाम आवार-पेण, ता.पेण, जि.रायगड, पिन-४०२१०७

Email : elraigad.ee@mahapwd.gov.in / elraigad.ee@gmail.com दूरध्वनी क्र.०२१४३-२९९२८८

Website : www.mahapwd.gov.in

जा.क्र.का.अ/राविवि/निविदा-२/२४१७/सन २०२२ दिनांक : २२/११/२०२२

### निविदा सुचना क्र.१५ सन २०२२-२३

संदर्भ : १) महाराष्ट्र शासन सा.बां.विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र.सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमारती-२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८

२) महाराष्ट्र शासन सा.बां.विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र.सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमारती-२ दिनांक २० मे २०२१

कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां.रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां.परिसर-पेण, ता.पेण, जि.रायगड, पिन कोड-४०२१०७ दूरध्वनी क्र.०२१४३-२९९२८८ यांचेकडून महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामांकरिता ब-१ नमुन्यातील टक्केवारी दर (Percentage Rate) निविदा ऑनलाईन प्रणालीद्वारे मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahapwd.gov.in (Pay PWD Online) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. येथून डाऊनलोड करण्यात यावी.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां.रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां.परिसर-पेण, ता.पेण, जि.रायगड, पिन कोड-४०२१०७ दूरध्वनी क्र.०२१४३-२९९२८८ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | निविदा उपलब्ध कालावधी | निविदापूर्व बैठक / ठेकेदारांचा वर्ग / इसारा रक्कम / कोरा निविदा शुल्क | निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Est.No.PESD/OW/14/2022-23 Providing Panel, cables and fire alram system in Hon Collector office extension Builsing at Alibag, Tal-Alibag, Dist-Raigad | रु.४१९३६७/- | दिनांक २८/११/२०२२ सकाळी ११.०० वाजेपासून दिनांक १३/१२/२०२२ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदापूर्व बैठक नाही. ठेकेरांचा वर्ग ड व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करू शकतात.<br>इसारा रक्कम रु.४२००/-<br>निविदा शुल्क रु.५००/- अधिक वस्तू व सेवा कर | दिनांक १४/१२/२०२२ सकाळी ११.०० |
| 02 | Est.No.PESD/OW/52/2022-23 Providing EI in Hashivare Police Station, at Hashivare, Tal-Alibag, Dist-Raigad | रु.३३४८१७/- | दिनांक २८/११/२०२२ सकाळी ११.०० वाजेपासून दिनांक १३/१२/२०२२ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदापूर्व बैठक नाही. ठेकेरांचा वर्ग ड व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करू शकतात.<br>इसारा रक्कम रु.३४००/-<br>निविदा शुल्क रु.५००/- अधिक वस्तू व सेवा कर | दिनांक १४/१२/२०२२ सकाळी ११.०० |
| 03 | Est.No.PESD/1023/2022-23 Providing 1.5 TR Air Conditioning Unit in VIP Rest House Suit No.1 Alibag, Tal-Alibag, Dist-Raigad | रु.३७६१६८/- | दिनांक २८/११/२०२२ सकाळी ११.०० वाजेपासून दिनांक १३/१२/२०२२ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदापूर्व बैठक नाही. ठेकेरांचा वर्ग ड व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करू शकतात.<br>इसारा रक्कम रु.३८००/-<br>निविदा शुल्क रु.५००/- अधिक वस्तू व सेवा कर | दिनांक १४/१२/२०२२ सकाळी ११.०० |
| 04 | Est.No.PESD/2166/2022-23 Providing SR to EI in District Hospital Pen, Tal-Pen, Dist-Raigad | रु.४३३९४०/- | दिनांक २८/११/२०२२ सकाळी ११.०० वाजेपासून दिनांक १३/१२/२०२२ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदापूर्व बैठक नाही. ठेकेरांचा वर्ग ड व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करू शकतात.<br>इसारा रक्कम रु.४४००/-<br>निविदा शुल्क रु.५००/- अधिक वस्तू व सेवा कर | दिनांक १४/१२/२०२२ सकाळी ११.०० |
| 05 | Est.No.PESD/OW/30/2022-23 Providing UPS, Telephone and Lan wiring in Hon Collector extention office Builing at Alibag, Tal-Alibag, Dist-Raigad | रु.५९९७५२/- | दिनांक २८/११/२०२२ सकाळी ११.०० वाजेपासून दिनांक १३/१२/२०२२ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदापूर्व बैठक नाही. ठेकेरांचा वर्ग ड व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करू शकतात.<br>इसारा रक्कम रु.६०००/-<br>निविदा शुल्क रु.५००/- अधिक वस्तू व सेवा कर | दिनांक १४/१२/२०२२ सकाळी ११.०० |
| 06 | Est.No.PESD/OW/2167/2022-23 Providing Air Conditioning unit with wiring in VIP Rest house Suit No.2, Tushar Alibag, Tal-Alibag, Dist-Raigad. | रु.३७६९७६/- | दिनांक २८/११/२०२२ सकाळी ११.०० वाजेपासून दिनांक १३/१२/२०२२ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदापूर्व बैठक नाही. ठेकेरांचा वर्ग ड व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करू शकतात.<br>इसारा रक्कम रु.६०००/-<br>निविदा शुल्क रु.५००/- अधिक वस्तू व सेवा कर | दिनांक १४/१२/२०२२ सकाळी ११.०० |
| 07 | Est.No.PESD/OW/43/2022-23 Providing Display System in new Collector office Building at Alibag, Tal-Alibag, Dist-Raigad | रु.६०३००९/- | दिनांक २८/११/२०२२ सकाळी ११.०० वाजेपासून दिनांक १३/१२/२०२२ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदापूर्व बैठक नाही. ठेकेरांचा वर्ग ड व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करू शकतात.<br>इसारा रक्कम रु.६०००/-<br>निविदा शुल्क रु.५००/- अधिक वस्तू व सेवा कर | दिनांक १४/१२/२०२२ सकाळी ११.०० |
| 08 | Est.No.PESD/OW/44/2022-23 Providing Soft VC system for new Collector office Building at Alibag, Tal-Alibag, Dist-Raigad | रु.६५८२१९/- | दिनांक २८/११/२०२२ सकाळी ११.०० वाजेपासून दिनांक १३/१२/२०२२ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदापूर्व बैठक नाही. ठेकेरांचा वर्ग ड व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करू शकतात.<br>इसारा रक्कम रु.६६००/-<br>निविदा शुल्क रु.५००/- अधिक वस्तू व सेवा कर | दिनांक १४/१२/२०२२ सकाळी ११.०० |
| 09 | Est.No.PESD/OW/2072/2022-23 Providing Repair of water tank cement concrete work and masonry work for Division office at Pen, Tal-Pen, Dist-Raigad | रु.४२२९९४/- | दिनांक २८/११/२०२२ सकाळी ११.०० वाजेपासून दिनांक १३/१२/२०२२ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदापूर्व बैठक नाही. ठेकेरांचा वर्ग ड व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करू शकतात.<br>इसारा रक्कम रु.४३००/-<br>निविदा शुल्क रु.५००/- अधिक वस्तू व सेवा कर | दिनांक १४/१२/२०२२ सकाळी ११.०० |

१) http://mahapwd.gov.in (Pay PWD Online) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)

२) कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां.रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां.परिसर-पेण, ता.पेण, जि.रायगड, पिन कोड-४०२१०७ दूरध्वनी क्र.०२१४३-२९९२८८ या कार्यालयातील सुचना फलक

३) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामधील नोंदणीधारक वरील निर्देशित विद्युत अनुज्ञाप्तीधारक ठेकेदारच निविदा सादर करू शकतात अन्य ठेकेदाराने सादर केलेली निविदा स्वीकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(सं.ध.कट्टी)**
**कार्यकारी अभियंता,**
**रायगड विद्युत विभाग,**
**सा.बां.पेण-रायगड**

क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/१५०/१७२७/२०२२